सकाळ

# सहकारातून दुर्बल घटकांचा विकास

## स्वरूप खारगे : 'रवळनाथ'च्या सहकार सप्ताहास प्रारंभ



**गडहिंग्लज : रवळनाथच्या प्रधान कार्यालयासमोर सहकार ध्वजवंदन करताना स्वरूप खारगे. शेजारी एम. एल. चौगुले, सुहास नाडगौडा आदी.**

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. १५ : "समाजातील दुर्बल घटकांचा विकास केवळ सहकारातूनच शक्य आहे. त्यामुळे सहकारातील सर्व घटकांची कार्यक्षमता वाढवण्यासह सहकारी संस्थांच्या कामकाजाला आधुनिकतेची जोड हवी. उद्देश व भावना चांगली असेल तर सहकाराचा हेतू सफल होईल," असे मत मुख्याधिकारी स्वरुप खारगे यांनी व्यक्त केले.

६९ व्या अखिल भारतीय सहकार सप्ताहानिमित्त श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी, ज्ञानदीप प्रबोधिनीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. संस्थापक-अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. निवृत्त अप्पर पोलिस अधीक्षक सुहास नाडगौडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. खारगे म्हणाले, "देशातील सहकार चळवळीत महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे. या चळवळीमुळेच राज्य व देशाच्या विकासाला गती मिळाली आहे. यामुळे सहकार संवर्धनासाठी नियोजनपूर्वक प्रयत्नांची गरज आहे. पारदर्शक कारभार, सामाजिक बांधिलकीमुळे उत्तुंग प्रगती केलेल्या 'रवळनाथ'चे कार्य कौतुकास्पद आहे."

श्री. चौगुले म्हणाले, "खुर्ची व पदापेक्षा कर्तव्याला प्राधान्य दिल्यानेच 'रवळनाथ'ला यश मिळाले. त्यास सर्व हितचिंतक, सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे आहे. 'रवळनाथ'च्या प्रधान कार्यालयासह गडहिंग्लज, आजरा, नेसरी, चंदगड, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी, कुडाळ या दहा शाखांतही सहकार सप्ताह साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येतील."

सुहास नाडगौडा यांचेही यावेळी भाषण झाले. सहकार सप्ताहनिमित्त संस्थेच्या प्रांगणात सकाळी नऊला सहकार ध्वजाचे ध्वजवंदन श्री. खारगे व श्री. चौगुले यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. आर. एस. निळपणकर, महेश मजती, मीना रिंगणे, संदीप कागवाडे, मनोहर गुरबे, शिवानंद घुगरे, प्रशासनाधिकारी सागर माने उपस्थित होते. संचालक डॉ. दत्ता पाटील यांनी प्रास्ताविक केले. गौरी बेळगुद्री यांनी सूत्रसंचालन केले. सीईओ डी. के. मायदेव यांनी आभार मानले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
16/11/2022 Page No. 3